**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**

**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
दि.०१/१०/२०२६

## प्रेस नोट

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत दि. २९/०९/२०२६ ते ०१/१०/२०२६ या कालावधीत *विविध कल्याणकारी योजनांमधील पात्र लाभार्थ्यांना धनादेश (चेक) वाटप* करण्यात आले. सदर कार्यक्रमा अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिका मुख्यालय, प्रभाग समिती आय व प्रभाग समिती एच येथे पार पडलेल्या कार्यक्रमाध्ये खालील योजने अंतर्गत लाभार्थ्यांना धनादेश (चेक) वाटप करण्यात आले

१. आधारमाया योजनेअंतर्गत एकाकी ज्येष्ठ निराधार २६ महिलांना प्रत्येकी रु.३६,०००/- या प्रमाणे एकुण रु.९,३६,०००/- इतके अनुदान वाटप करण्यात आले.

२. विद्यावर्धीनी योजनेअंतर्गत विधवा/निराधार/घटस्फोटित/परितक्त्या ०७ महिलांच्या पाल्यांना शिक्षणासाठी रु.७३,०००/- इतके अनुदान वाटप करण्यात आले.

३. विधवा/निराधार/घटस्फोटित/परितक्त्या ०३ महिलांच्या मुलींच्या विवाहासाठी प्रत्येकी रु.२५,०००/- या प्रमाणे रु.७५,०००/- इतके अनुदान वाटप करण्यात आले.

४. कर्करोग पिडित महिलांच्या उपचारा करिता ०३ लाभार्थ्यांना प्रत्येकी रु.२५,०००/- या प्रमाणे रु.७५,०००/- इतके अनुदान वाटप करण्यात आले.

सदरचा संपूर्ण कार्यक्रम मा.महापौर, मा.उप महापौर व मा. आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडला. याप्रसंगी मा.अतिरिक्त आयुक्त श्री.दिपक सावंत आणि महिला व बालकल्याण समितीच्या मा. सभापती श्रीम. बिना मायकल फुट्यार्डो व मा.उप सभापती श्रीम. सुर्वणा अजित पाटील तसेच सन्माननीय नगरसेवक व नगरसेविका व महिला व बालकल्याण विभागाच्या उपायुक्त डॉ. करुणा जुईकर व सहाय्यक आयुक्त श्रीम.निलाक्षी पाटील तसेच प्रभाग समिती सहाय्यक आयुक्त व महिला व बालकल्याण विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. यांच्या हस्ते पात्र लाभार्थ्यांना धनादेश सुपूर्द करण्यात आले.

महिला व बालकल्याण विभाग

वसई-विरार शहर महानगरपालिका